# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १३/०७/२००६ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दि. १३ जूलै २००६ रोजी मा. महापौर श्री.किशनचंद लेखराज तणवानी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मनपाच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह'' येथे दुपारी १२-४५ वाजता ''वंदे मातरम'' या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त यांचे सह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके (पाटील)
०४. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
०५. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१६. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१७. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१८. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१९. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२०. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२१. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२२. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२५. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२६. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२७. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२८. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन
२९. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३०. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३१. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३२. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३३. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस

३४. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३५. स.स.श्री.खान निसार मो.खान
३६. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
३७. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३८. स.स.सौ.राऊत छाया विलास
३९. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४०. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४१. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४२. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४३. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४४. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४५. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
४६. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४७. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४८. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४९. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५०. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५२. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५३. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५४. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५५. स.स.श्री.खुडे विजय किसन
५६. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५७. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५८. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५९. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६०. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६१. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६२. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६३. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६४. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६५. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६६. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
६७. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६९. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७०. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७१. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७२. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७३. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७४. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग
७५. स.स.श्री.बारवाल गजानन
७६. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस

७७. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार

७८. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.राजेश व्यास

०२. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

०३. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

श्री.संतोष खेंडके : मुंबई येथे बॉम्ब स्फोटची घटना घडली व २०० लोकांचा बळी गेला तसेच स्व. मिनाताई ठाकरे यांचे पुतळ्याची विटंबना करण्यात आली या घटनेचा निषेध करावा व ज्याचा यात निष्पाप लोकांचा बळी गेला त्यांना श्रध्दांजली अर्पित करावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : यास माझे अनुमोदन आहे. दोन मिनिटं स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.अ.रशिद खान : निष्पाप लोकांचा बळी गेला, त्यांना पोलीसांनी पकडावे. श्रध्दांजली अर्पण करावी. स्व.मीनाताई ठाकरे यांची पुतळ्याची विटबंना करणारे लोकांना पोलीसांनी शोधून काढावे तसेच गुलमंडीवर दंगा घडविण्याचा प्रयत्न करणारे त्यांचाही शोध घ्यावा. ज्यांनी हे कृत्य केले त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

डॉ.भागवत कराड : जी घटना मुंबई मध्ये घडली त्या समाजकंटकाविरूध्द निषेध करावा.तसेच मृत्यू झालेल्यांना श्रध्दांजली अर्पण करावी व महापालिकेने रक्तदान शिबीर घेण्यात यावे.

मा.महापौर : सर्वानी श्रध्दाजंली साठी उभे रहावे.

याच वेळी मुंबई येथे झालेल्या बॉम्ब स्फोटातील निष्पाप मृत्यू झालेल्यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री. प्रशांत देसरडा :सभागृहात एक अधिकारी नवीन दिसत आहे त्याचा परीचय करून दयावा.

मा. महापौर :आजची सभा विशेष सभा आहे जो अहवाल दिलेला आहे त्यावरच चर्चा करावी इतर विषयावर २० तारखेला सभा आयोजित होईल त्यावेळी चर्चेला घ्यावेत.

श्री.प्रशांत देसरडा :माझी हरकत नाही. परंतू या सभागृहाचा अपमान आहे. अधिकाऱ्याची बदली करावी म्हणून सभागृहाने निर्णय घेतलेला असतांना पून्हा ते अधिकारी सभागृहात दिसतात.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ : स.सदस्य श्री. देसरडा यांनी जी सुचना केली त्याचा खूलासा करावा.

मा.महापौर :मालमत्ता विभागा संबधी ही बैठक असून जे या संबंधीत अधिकारी असतील ते अस्थापना, विधी सल्लागार तसेच मालमत्ता अधिकारी यांनी थांबावे. इतर अधिकाऱ्यांनी थांबण्याची आवश्यकता नाही.

**विषय क्र. २८० :**

मालमत्ता विभागाच्या कामकाजासंबंधी चर्चा व विचार विनिमय करणे.

**संवाद :**

श्री. संजय जोशी :आजच्या सभेची विषय पत्रिका या पूर्वी म्हणजे जेंव्हा पहिल्यांदा मिळाली होती त्यात विषय असा दिला की मालमत्ता विभागा संबधी मुख्यलेखा परीक्षक यांनी दिलेल्या तपासणी अहवालावर विचार विनीमय करणे असे नमूद केले पून्हा दूसऱ्यादा कार्यक्रम पत्रिका मिळाली त्यात या विषया ऐवजी मालमत्ता विभागाच्या कामाकाज संबधी चर्चा व विचार विनिमय करणे असे दिले तर मालमत्ता विभागाच्या कामकाजाविषयी चर्चा करायची की मुख्यलेखा परीक्षक यांनी मालमत्ता संबधी दिलेल्या अहवालावर चर्चा करायची.

मा.महापौर : विषय पत्रिका माझ्याकडून पत्र गेल्यानंतर काढलेली आहे. मालमत्ता विभागाचे लेखा परीक्षण अहवाल स्थायी समिती कडून अंतिम झाल्यानंतर या सभागृहासमोर येईल, जो अहवाल विषय पत्रिकेसोबत दिला त्यावर चर्चा करावी.

श्री. संजय जोशी :हा लेखा परीक्षण  अहवाल नसून तपासणी अहवाल आहे लेखा परीक्षण अहवाल हा लेखा परीक्षका प्रमाणे लिहीलेलेले असते तो बंच असतो यात सविस्तर लिहीलेले नाही हा फक्त तपासणी अहवाल आहे.

मा. महापौर : यावर आपले मत काय आहे.

श्री. संजय जोशी : हा तपासणी अहवाल आहे बदल करण्याची गरज नव्हती. लेखा परीक्षण अहवाल हा स्थायी समिती सभेसमोर जात असतो. तपासणी अहवाल मागविण्याचे अधिकार या सभागृहाला आहे.

मा. महापौर : हा तपासणी अहवाल आहे.  महत्वाचा विषय असून या बाबतीत सभागृहाचे मत घेवून निर्णय घ्यायचा आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : लेखा परिक्षण अहवालावर स्थायी समितीमध्ये संपूर्ण चर्चा करण्यात आलेली होती. कलम १०६ प्रमाणे सर्व स्थायी समितीच्या सदस्यांनी चर्चा केली होती. दिनांक १०.३.२००६ रोजी  अहवालावर चर्चा झालेली होती लेखा परिक्षणासंबंधी जो अनुपालन अहवाल द्यावयाचा बाकी आहे तो तीन दिवसात लेखा परिक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा व जे कूणी दोषी असेल त्याचेवर प्रशासनाने कार्यवाही करावी व नंतर चौकशी करावी असा निर्णय झालेला आहे.  हा अहवाल मा. महापौरांनी वितरीत करण्यात यावा असे स्पष्ट आदेश दिले होते.  तीन महिने ६ दिवस झाले तरीही प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही. जो अहवाल दिलेला आहे त्यात जवळपास दोन ते अडीच कोटीचा अपहार झालेला आहे. अधिकार नसतांना देखिल अधिकाराचा गैरवापर करून महानगरपालिकेची आर्थिक बाजू सक्षम होवू शकते त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे. म्हणून  अहवालात स्पष्ठ असे दिलेले आहे जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाहीचा निर्णय घेण्यात यावा पुन्हा चौकशी करण्याची गरज नाही .जेणे करून होत असलेला भ्रष्टाचार थांबेल व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल व योग्य तो निर्णय आज घेतला तर नागरीकांकडे ही चांगला संदेश जाईल असे माझे मत आहे.

सौ. लता दलाल :स्थायी समितीमधे दोषीवर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते .आतापर्यत किती अधिकारी कर्मचारी यांचेवर मा.आयुक्तांनी कार्यवाही केलेली आहे.

श्री. गजानन बारवाल :जो अहवाल सादर केलेला आहे यात जे दोषी आढळून आलेले आहे त्या संबधी मा. आयुक्तानी कार्यवाही केलेली आहे किंवा करणार आहे काय याचा खूलासा घेण्यात यावा.

उपआयुक्त, महसूल : सन २००२ ते ०५ या तीन वर्षाचा मालमत्ता विभागाची जी जी कामकाज पध्दती आहे व जे शेरे व अनियमितता दर्शविलेली आहे त्याची विभागणी प्रशासनाने दोन भागामधे केलेली होती. पहिल्या भागात उदा. बाजाराची वसूली न करणे महानगरपालिकेचे पैसे बूडवून न सापडणे,मालमत्ता महानगरपालिकेच्या नावावर नसणे यासाठी प्रशासनाने सविस्तर अशी कार्यवाही करून १७ लक्ष रक्कम विविध ठेकेदाराकडून वसूल केलेली आहे. ज्या ठेकेदारानी महानगरपालिकेची रक्कम बुडविण्याचा प्रयत्न केला त्यांचे विरूध्द पोलीसात गुन्हा दाखल केलेला आहे. मालमत्ता विभागाने जे लोक महानगरपालिकेची फसवणूक करीत असलेल्याचा शोध घेतला असता अनेक लोकांच्या नावावर महानगरपालिकेच्या हद्यीत मालमत्ता नाही. तसेच अनेक लोक सापडत नाही अशा लोका विरूध्द प्रशासनाने १२ लोकांवर गुन्हे दाखल केलेले आहे. हा भाग अनियमितता झालेल्या किंवा रक्कम वसूल करण्याच्या संदर्भात आहे. या कालावधीत जे मालमत्ता अधिकारी कर्मचारी कार्यरत होते त्याची माहिती प्रशासनाने अस्थापनाविभागाकडून माहिती घेतलेली आहे. या संबधीचा सविस्तर अहवाल मा.आयुक्त यांना दिं. २.५.२००६ रोजी सादर करण्यात आलेला

होता.मा.आयुक्त यांचे आदेशानूसार या कालावधीमधे श्री.गिरी व श्री.शिरीष रामटेके हे मालमत्ता अधिकारी व त्यांचे अधिनस्त एकूण १० कर्मचारी कार्यरत होते. या सर्व कर्मचाऱ्यांना प्रशसनाने महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ नुसार कार्यवाही का करण्यात येवू नये म्हणून कारणे दाखवा नोटीस बजावलेल्या आहेत. श्री.गिरी व श्री.रामटेके यांना उपआयुक्त (म)या स्तरावर अगोदरच कारणे दाखवा नोटीस दिलेल्या होत्या श्री.गिरी यांचा जो खुलासा आलेला आहे तो असमाधानकारक असल्यामूळे त्यांचेवर कार्यवाही प्रस्तापित केली आहे. श्री.शिरीष रामटेके यांचेकडून प्रशासनास अदयाप खूलासा प्राप्त झालेला नाही.

श्री.त्र्यबंक तुपे : श्री.गिरीवर जी कार्यवाही झाली ती या प्रकरणात झालेली नाही.

श्री. संजय जोशी : दि.१०.३.२००६ रोजी या संबधी सविस्तर चर्चा स्थायी समितीमधे झाली या अहवालात वेळोवेळी तपासणीकांनी संबधीत विभागास लेखी माहिती मागविली ती उपलब्ध झालेली नाही. लेखी मागणी करूनही संबधीत अधिकारी कर्मचारी यांनी अभिलेखे जे की संचिका व इतर लेखी माहिती लेखा परीक्षण विभागास उपलब्ध न करून दिल्याबध्दल (Non Production of Papers) प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. जी नोटीस वगैरे दिली ती कार्यवाही तुटपुज्या स्वरूपाची झालेली आहे. ठोस कार्यवाही काय केली. मुख्य लेखा परिक्षकांनी वेळोवेळी मागणी करून अभिलेख उपलब्ध करून दिले नाही. हा महत्वाचा मुद्दा आहे.

श्री. अ. रशिद खान :सन २००२ पासून ऑडीट रिपोर्ट आला त्यापूर्वीचे ऑडीट रिपोर्ट का दिलेला नाही. तसेच काही रक्कमा वसूल होणार आहे असे म्हटले. किती वसूल झाले ते नमूद केलेले नाही. स्थायी समितीच्या मंजूरी शिवाय काम कसे दिले. त्यावेळी आचार संहिता होती का. आता किती रक्कम शिल्लक आहे, खूलासा करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार: अहवालामध्ये अनियमितता झालेली आहे.त्यासंबधी आतापर्यत कार्यवाही झालेली नाही.

मा. महापौर : वेळोवेळी अभिलेख उपलब्ध करून दिले नाही, त्या संबधी काय कार्यवाही केलेली आहे याचा खूलासा करावा.

उपआयुक्त, (महसूल) : लेखा परीक्षण अहवालमध्ये ज्या काही तृट्या उपस्थित करण्यात आलेल्या आहे. त्यामध्ये काही संचिका उपलब्ध नसणे हा एक महत्वाचा भाग होता. लेखा परीक्षकांचा पहिला अहवाल आल्यानंतर मालमत्ता विभागाने आपल्या विभाग अंतर्गत सर्व संचिकेचा शोध घेतला, त्यामध्ये काही संचिका आढळून आल्या, मालमत्ता विभागाचे रेकॉर्ड जुने असून काही संचिका अदयापही सापडत नाही म्हणून स्थायी समितीच्या बैठकीतही मी खूलासा केलेला होता. शोध सुरू आहे.

श्री. संजय जोशी :मालमत्ता विभागाचे रेकॉर्ड जुने असेल परंतू अहवाल हा सन २००२ पासूनचा समोर आलेला आहे हे रेकॉर्ड महापालिकेकडे नाही का,याचा खूलासा करावा मागिल रेकॉर्ड मागत नाही. बाजारात अनियमितता,क्रांतीचौक पेट्रोलपंप त्याची चर्चा नाही.

उपआयुक्त, (महसूल) : बाजार विषयीच्या संचिका सापडत नाही. ठेकेदार मार्फत जे वसूली केली आहे त्या सचिका उपलब्ध आहे. मधल्या काळात ठेकेदारास वसूलीचा ठेका दिलेला नव्हता. तो कालावधी दोन महिने अडीच महिण्याचा आहे त्या संचिका सापडत नाही. या बाबतीत श्री.गिरी, श्री.शहापूरवाड अनुरेखक यांचेवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

श्री. संजय जोशी : श्री.शहापूरवाड यांचेवर कार्यवाही मालमत्ता विभागात असतांना झालेली नाही ते पाणीपूरवठा विभागात बदली केली ते रूजू झाले नाही म्हणून त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही केलेली आहे. कृपया सभागृहाची दिशाभूल करू नये. ज्यांनी अभिलेखे उपलब्ध करून दिले नाही त्या संबधी काय कार्यवाही केली.

श्री. कोकाटे काशिनाथ :उपआयुक्त (महसूल) हे शिताफिने खूलासा करीत आहे. दि.१०.३.२००६ रोजी स्थायी समितीमधे या अहवालावर चर्चा होवून कार्यवाही करण्याचे आदेशीत केलेले होते. त्यानूसार प्रशासनाने संबधीतावर आतापर्यत का कार्यवाही केलेली नाही. काय अडचण होती. ओव्हर टेक करून मनमानी करणे चूकीचे आहे. उपआयुक्त (म.) यांचा खूलासा चूकीचा आहे. स्थायी समिती सभेचा अपमान केला की, नाही.

सौ. लता दलाल :दिं. १०.३.२००६ च्या स्थायी समितीमधे लेखा परीक्षण अहवालावर चर्चा होवून कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. आताच उपआयुक्त यांनी खूलासा केला की श्री. गिरी यांचेवर निलबंणाची कार्यवाही केली परंतू त्यांचेवर केलेली कार्यवाही ही वार्ड कार्यालय क मधे झालेल्या रक्कमेच्या अपहारा बाबत केलेली आहे असे वृत्तपत्रात आलेले आहे. मालमत्ता विभागाच्या बाबतीत त्यांचेवर कार्यवाही केलेली नाही सत्य खूलासा करावा सभागृहाची दिशाभूल करू नये.

उपआयुक्त,(महसूल) : श्री.गिरी हे मालमत्ता अधिकारी त्यावेळी होते आता नाही व त्या संदर्भात त्यांना एप्रिल २००६ मध्ये उपआयुक्त (महसूल) या स्तरावर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली होती. त्यांनी खुलासा समाधानकारक नसल्यामूळे प्रशासनाने त्यांना शिस्त भंगाची कार्यवाही का करण्यात येवू नये अशी नोटीस काल बजावलेली आहे. जी कार्यवाही निलंबणाची करण्यात आलेली आहे ती कार्यवाही वार्ड कार्यालय क मधील मालमत्ता च्या अनियमिततेच्या संदर्भात आहे.

श्री. संजय जोशी :अभिलेखे उपलब्ध न करून दिल्याबध्दल कलम ५६ नुसार प्रशासलनाला कार्यवाही करण्याचा अधिकार आहे ती कार्यवाही का केलेली नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : लेखा परिक्षणासाठी मूळ कागदपत्रे दिली नाही, याबाबत काय कार्यवाही केली.

उपआयुक्त,(महसूल) :मालमत्ता अधिकारी म्हणून त्यावेळी कार्यरत असलेले श्री. डी. ए गिरी यांचेवर जे वेगवेगळे आरोप ठेवण्यात आले होते त्यात नॉन प्रोडक्शन ऑफ डाकूमेट हा सूध्दा एक आरोप होता त्यांना शिस्तभंगाची कार्यवाही का करण्यात येवू नयेम्हणून नोटीस बजावलेली आहे मुदत संपल्यानंतर त्यांचेवर कार्यवाही केली जाईल.

श्री. संजय जोशी :संबधीत अधिकारी कर्मचारी यांनी पैसे तर वसूल केले नाही हा गुन्हा आहे परंतू सर्वात मोठा गून्हा हा आहे की संचिकाच उपलब्ध करून न देणे यांना कारणे दाखवा नोटीस न देता बडतर्फ करावयास पाहिजे होते.

डॉ. भागवत कराड : वारंवार चौकशी अधिकारी सांगतात मला संचिका व रेकॉर्ड उपलब्ध करून दिले नाही रेकॉर्ड दिले नाही तर चौकशी काय करणार. यात एक ते तीस जे मुद्दे दिलेले आहे यात मोठा भ्रष्टाचार झालेला आहे महानगरपालिकेचे मोठे दोन ते अडीच कोटीचे नुकसान झालेले आहे ज्या अधिकाऱ्यांनी कर्मचारी यांनी संचिका व रेकॉर्ड किंवा माहिती देण्यास दिरगाई केलेली आहे त्यांचेवर कार्यवाही होणे गरजेचे होते ती कार्यवाही झालेली नाही.

सौ. लता दलाल :स्थायी समितीने निर्देश दिल्यानूसार किती अधिकारी कर्मचारी यांचेवर मा. आयुक्तांनी कार्यवाही केली आहे.

श्री. सतीश कटकटे :मी मा.आयुक्त यांना ११.८.२००५ रोजी पत्र दिले होते. मालमत्ता अधिकारी तसेच संबधीत ठेकेदार यांनी गैर व्यवहार केलेला आहे.१८.८.२००५ रोजी मा.आयुक्त यांनी संबधीत अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमत करून गैरव्यवहार केलेला आहे असे दिले होते. प्रशासनाने भ्रष्टाचार झाल्याचे मान्य केलेले आहे. त्यानंतर का कार्यवाही केलेली नाही.

मा. महापौर : मा.आयुक्त यांनी या सर्व सूचनावर खूलासा करावा.

मा.आयुक्त : ३-४ मुद्दे उपस्थित केलेले आहे. अभिलेखे उपलब्ध करून देत नाही म्हणून मुख्य लेखा परीक्षक यांनी मला म्हटले होते. त्यानंतर मी बैठक घेवून सर्व विभाग प्रमूख

यांना सांगितले होते की अभिलेखे आपआपल्या विभागाकडून उपलब्ध करून दयावे. त्यानंतर १०.३.२००६ रोजी स्थायी समितीची बैठक या संबधी झाली होती त्याचे इतिवृत्त मिळालेले नाही. ज्यांनी अभिलेखे उपलब्ध करून दिले नाही त्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्यात श्री.गिरी व श्री.रामटेके यांचा समावेश आहे. श्री.गिरी यांचा खूलासा प्राप्त झाला व तो समाधानकारक नसल्यामूळे डीई का करण्यात येवू नये म्हणून पून्हा नोटीस देण्यात आलेली आहे.जो काही ठपका ठेवण्यात आला तो अभिलेखे उपलब्ध करून न देण्याचा आहे. स्थायी समितीमधे दुसऱ्या एका विषयावर चर्चा झाली होती त्या संदर्भात श्री.डी.ए.गिरी यांचे निलंबन झालेले आहे. या कालावधीतील एकूण १५ कर्मचारी आहे सर्वांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. पैसे वसूलीबाबत कार्यवाही केलेली आहे. काही वसूल झाले. चेक वटल्या गेले नाही, त्यांचेवर खातेनिहाय चौकशी करण्या संदर्भात सेवा निवृत्त न्यायधिश श्री.निरखी यांचेकडे दिली आहे. सादरकर्ता अधिकारी कार्यकारी अभियंता आहे.त्यांनी दोन महिण्याची मूदत मागितलेली आहे. निष्काळजीपणाबाबत कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे.

श्री.संजय जोशी : अभिलेखे उपलब्ध करून दिले जात नाही त्यांना फक्त प्रशासनाने कारणे दाखवा नोटीसेस दिलेल्या आहे. डी ई केली जाते हे वाक्य इतिवृत्तात येवू दयावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : स्थायी समितीच्या सभेचे इतिवृत्त मिळाले नाही असे मा.आयुक्तांनी खूलासा केला परंतू सदर सभेच्या वेळी मा.आयुक्त किंवा आयुक्त नसतील तर प्र आयुक्त म्हणून जे अधिकारी असतील त्यांचा सभेत सहभाग असतो. स्थायी समितीने दिलेल्या निर्देशानूसार कार्यवाही करावयास पाहिजे होते. यासाठी इतिवृत्ताची देखील गरज नाही. म्हणून त्यासाठी मी नेहमी माझे मत मांडतो की जे निर्णय आम सभेत होतात त्यावर काय कार्यवाही केली त्याची माहिती पुढील सभेच्या वेळी सादर करणे आवशक असते.परंतू त्याची गेल्या१५महिण्यापासून दखल घेतली जात नाही.

सौ. लता दलाल : १०.३.२००६ रोजी स्थायी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त मिळाले नाही मा.आयुक्तांनी आताच खुलासा केला परंतू स्थायी समितीत जी चर्चा झाली होती त्या अनुशंगाने श्री.गिरी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही केली त्या बाबतचे इतिवृत्त प्रशासनाकडे कोठून आले. जकात खाजगीकरणाचे. बीओटी संदर्भात घेतलेल्या प्रस्तावाचे इतिवृत्त कारणा पूरता ताबडतोब मिळू शकते त्याची प्रशासनाकडून मागणी केली जाते. भ्रष्टाचार होतो त्या संबधीच्या बैठकीचे इतिवृत्त का मिळू शकत नाही. इतिवृत्त कारणा पूरता उतारा मिळणेसाठी प्रशासनाने का मागणी केली नाही. मुख्य लेखा परीक्षक यांनी केलेली चौकशी व दिलेला तपासणी अहवाल हा चूकीचा आहे असे प्रशासनाचे मत आहे काय खूलासा करावा.

डॉ. भागवत कराड : स्थायी समितीचे सभांना मा.आयुक्त असतात.

सौ. लता दलाल :कर्मचाऱ्याना मा. आयुक्त पाठीशी घालतात काय अशी शंका येत आहे.

मा.आयुक्त : स्थायी समिती जेंव्हा बैठक होते त्या बैठकीत मी असतोच जरी उपस्थित असलो तरी कोणता प्रस्ताव असेल चर्चा असेल कार्यवाही करण्यासाठी कार्यवृत्ताची प्रत आवश्यक असते. इतर प्रस्तावांचे कारणा पूरता उतारा घेतला आहे. स्थायी समितीने लेखा परीक्षण अहवालावर चर्चा करून नंतर सर्वसाधारण सभेसमोर ठेवायचे असते. सदर सभेचे इतिवृत्त मिळाले नाही. चर्चा काय झालेली आहे हे मला माहित आहे. चर्चेमध्ये आयुक्तांनी सहभाग घ्यावा असे ॲक्ट मध्ये आहे. इतिवृत्ताची वाट न बघता संबधीत अधिकारी कर्मचारी यांना आदेशीत केले की किती वसूली झालेली आहे किती राहिलेली आहे त्या संबधी कार्यवाही करावी. ज्यांचेकडून वसूली झाली नाही त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. जे

अधिकारी या कालावधीत होते त्यांना नोटीसेस दिलेल्या आहे कारण त्यांचे म्हणणे ऐकूण घेणे आवशक आहे. समाधानकारक उत्तर न आल्यामूळे डीइ प्रस्तावित केली आहे. जरी लेखा परीक्षणाचा अहवाल दोषी आढळून आले असेल तरी डीई करण्याची आवश्यकता आहे. त्यांना ऐकून घेणे गरजेचे असते. त्याशिवाय ॲक्शन घेता येत नाही. डीई करावीच लागते. निवृत्त न्यायधिशामार्फत खाते चौकशी करण्यात येत आहे.

श्री.सतीश कटकटे :रू.११.४० लक्षचा भ्रष्टाचार झाला की नाही याचा प्रशासनाने खूलासा करावा.

मा.आयुक्त :त्या प्रकरणात संबधीतावर गुन्हा दाखल केलेला आहे. जे धनादेश दिले होते ते बाऊन्स झालेले आहे. महापालिकेकडे रक्कम जमा झाली नाही म्हणून गुन्हा दाखल केलेला आहे. श्री. रामटेके यांचे बाबतीत डीई केलेले आहे. एक महिण्याची चौकशीसाठी मूदत मागितलेली आहे.

श्री. सतीश कटकटे : संबधीत ठेकेदार व अधिकारी यांनी भ्रष्टाचार केला. निवृत्त न्यायधिश यांचेकडे चौकशीसाठी दिले ११,४०,०००/- चा भ्रष्टाचार झाला. एक वर्ष झाले पत्रात स्पष्ट दिलेले आहे.

मा.महापौर : स.सदस्य श्री.कटकटे यांना या संबधी उपआयुक्त(म.)यांनी लेखी माहिती द्यावी

श्री.मुजीब खान :अहवालावर सुरूवातीपासून चर्चा व्हावी. पान क्र १ पासून सूरूवात करावी.

श्री.गजानन बारवाल : अहवालातील क्र १ वर चिकलठाणा आठवडी बाजारच्या संदर्भात मी बोलतो यात स्थायी समितीची मान्यता घेतलेली दिसून येत नाही. तसेच निविदा अटी प्रमाणे २५ टक्के रक्कम अनामत भरून घेतलेली नाही. करारनामा करण्यापूर्वीच वसूलीसाठी आदेश देण्यात आले. तसेच रूपये ८६,६००/- अदयाप भरणा केलेले नाही तसेच सन २००३-०४ मधे करारनामा करून घेण्यात आलेला नाही.

मा.महापौर : सन २००२-२००३ या वर्षासाठी चिकलठाणा बाजाराची वसूलीसाठी ठेका देण्यासाठी समितीची मान्यता घेतलेली आहे किंवा नाही याचा खूलासा करावा.

उपआयुक्त,(महसूल) : स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली नाही.त्यावेळी श्री.डी.ए.गिरी हे मालमत्ता अधिकारी म्हणून कार्यरत होते.

मा.महापौर : हे योग्य आहे की, नाही.

मा.आयुक्त : हे योग्य नाही. खाते चौकशी मध्ये हा मुद्दा आहे.

श्री.अ.रशीद खान : स्थायी समितीची मान्यता घेतली नाही त्यावेळचे मा.आयुक्तांची सही आहे का, असेल तर, ते ही दोषी ठरतील.

उपआयुक्त, (महसूल) : सन २००२-०३ या वर्षातील उर्वरीत रू.५०,०००/- वसूल करणे होती ती सर्व वसूल करण्यात आलेली आहे यात महापालिकेचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

श्री.संजय जोशी : अहवालात नमूद केल्याप्रमाणे एप्रील २००२ ते ५ ऑगस्ट २००२ पर्यत एकूण १८ बाजार झाले.प्रत्येक बाजाराची रूपये ८,८४६ इतकी रक्कम आधारभूत धरून याची वसूली कोणी केली . कूठे झाली याची कूठेच नोंद नाही.

उपआयुक्त, (महसूल) : स.सदस्य श्री.बारवाल यांनी जो मुद्दा मांडला की, स्थायी समितीची मंजूरी घेतली नाही तो ठेका ४.६० लक्षामध्ये देण्यात आलेला आहे. मी जो खुलासा केला तो १ एप्रिल २००२ ते ५ ऑगस्ट २००२ पर्यतचा कालावधी वगळून केलेला आहे. या कालावधीत वसूली कोणी केली याचा कुठेही बोध होत नाही व त्या संबधीचे रेकॉर्ड महानगरपालिकेकडे सापडत नाही.

श्री.संजय जोशी : अधिकारी यांनी अगोदर खूलासा करून दिशाभूल केलेली होती. त्या बाजाराच्या वसूली संदर्भात काहीच नुकसान झाले नाही असा खूलासा केला परंतू १ एप्रिल २००२ ते ५ ऑगस्ट २००२ पर्यतच्या १८ बाजाराची प्रत्येक बाजाराची रूपये ८८४६ प्रमाणे १,५९,२३० रू. महानगरपालिकेचे नूकसान झालेले आहे. दुर्दैव

असे की ही वसूली कदाचित महानगरपालिकेच्याच अधिकाऱ्यानी केली असावी. त्या संबधीची पावती सुध्दा माझ्याकडे आहे वेळ पडल्यास ती दाखविण्यात येईल.

मा.आयुक्त :या कालावधीत स. सदस्य म्हटल्याप्रमाणे १८ बाजार झाले या बाजाराची वसूली कोणी केली त्याचे रेकॉर्ड महानगरपालिकेकडे असावयास पाहिजे. स.सदस्य श्री.संजय जोशी यांचेकडे या कालावधीत वसूली केल्याची पावती आहे असे म्हटले. ती त्यांनी प्रशासनाकडे दयावी त्यांची नोद महानगरपालिकेच्या रेकॉर्डला आहे की नाही हे तपासून त्यावेळी जे अधिकारी होते त्यांचेकडून वसूल करण्यात येईल.

श्री.संजय जोशी :ऑडीट करतांना संचिका चौकशीसाठी दिल्या जात नाही हा गंभीर गुन्हा आहे मी पहिल्यांदाच म्हटले. संचिका असेल तर बघू आता प्रशासनाने खुलासा केला. संचिका ऑडीटच्या चौकशीसाठी दिल्या असत्या तर एवढी चर्चा करण्याची वेळ ही आली नसती. या अहवालात गंभीर स्वरूपाच्या तृटी आहेत. त्या आजपर्यत का प्रशासनाने तपासल्या नाहीत.आता चौकशीची आवशकता नाही. रक्कम वसूल करण्याची गरज आहे.

श्री. संजय सिरसाट :प्रशासनाने असा खूलासा केला की या अहवालावर सभागृहात चर्चा करू नये.या सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. सन २००२ पासून चौकशी चालू आहे. त्यावेळी श्री. गिरी हे मालमत्ता अधिकारी होते त्यानंतर श्री.शिरीष रामटेके होते. ते सर्व आता बदलले आणि स्थायी समितीच्या निर्णायानूसार परवा श्री. गिरी यांचेवर कार्यवाही केली. सन २००२ मधे भ्रष्टाचार होतो. जेंव्हा स. सदस्यांना वाटले भ्रष्टाचार झाला या संबधी सभा आयोजीत केली पाहिजे व संबधीतांवर कार्यवाही झाली पाहिजे म्हणून स्थायी समितीच्या चार सदस्यांनी मा.महापौर यांना पत्र देवून ही सभा आयोजित करावयास कळविलेले आहे.१६-१७ कर्मचाऱ्याना नोटीसा दिल्या आहेत. हे पत्र मी आजच मा.महापौरांकडे पाहीले. सभा सुरू झाली तेंव्हा मा. महापौर यांनी या संबधी जे अधिकारी असतील त्यांनी बसावे असे आदेशीत केले. श्री. डी. ए गिरी हे निलंबीत असूनही सभागृहात आहे. हा प्रश्न पहिल्यांदा सर्वसाधारण सभेत आला अशातला भाग नाही. स्थायी समिती मधे यावर भरपूर चर्चा झाली. नविन मा.आयुक्त आले व श्री.शिरीष रामटेके यांना तडकाफडकी निलंबीत केले. माझ्या माहिती प्रमाणे त्या दिवशी मा.आयुक्तांनी असे स्टेटमेन्ट केले होते की त्यास एक वर्षाचा कालावधी झाला असावा. की निवृत्त न्यायाधिश यांचेकडे हे प्रकरण चौकशी साठी देवू व दोन महिण्यातच अहवाल घेवू . म्हणजे एक वर्षापूर्वी जी चौकशीसाठी कालावधी दिला होता त्याची चौकशी आणखी एक दोन महिणे चालणार आहे. चौकशी चालू आहे डीई झाल्याशिवाय कार्यवाही करता येणार नाही हे असेच चालू राहिले तर प्रत्येक प्रश्नावर चर्चा करून उपयोग काय? चिकलठाणा बाजार मधेच एकूण १.२७ कोटीचा भ्रष्टाचार दाखविण्यात आलेला आहे.या सारखे अनेक बाजार आहेत. हा जो अहवाल आलेला आहे तो जवळपास मा. आयुक्तांना सुध्दा तीन महिण्यापूर्वी गेलेला आहे. मा. आयुक्तानी खूलासा करावा की कार्यवाही किती दिवसात करणार आहे.नगरसेवकानी सुचवल्यानंतर कार्यवाही करायची असा काही नियम नाही. ९० दिवसात डीई का केलेली नाही. मा. आयुक्त काय कार्यवाही करणार आहे याचा खूलासा करावा नसता यापूढे कुणी सदस्य अशा प्रकरणाच्या बाबतीत नगरसेवक पूढे येणार नाही त्यामूळे आजच्या आज या बाबतीत निर्णय घेण्यात यावा अशी विनंती करतो.

श्री.अ. रशिद खान :किती वसूली करण्यात आलेले आहे. मा. आयूक्तांनी मान्यताहोती काय याचाही खूलासा करावा.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :खोटया पावत्या वसुली करणे व त्या पावत्या महानगरपालिकेकडे जमा न करणे.असे प्रकार घडतात. जो पैसा ज्यांनी संगनमत करून जमा केला आहे त्याची चौकशी व्हावी. मा. आयुक्तांनी यामधे लक्ष घालून कार्यवाही करावी.

श्री. अ. रशिद खान :१ एप्रिल २००२ ते ५ ऑगस्ट २००२ पर्यत कोणी वसूली केलेली आहे याचा खूलासा करावा.

मा. महापौर :उपआयुक्त महसूल यांनी खूलासा करावा.

उपआयुक्त (म) : रू.४६,०००/- सर्व रक्कम वसूल केली. १.४.०२ ते ५.८.०२ कालावधीची अद्यापही वसूली झाली नाही असा होत नाही.

श्री. संतोष खेंडके : मूळ विषयपत्रिका सुरू करावी.

श्री.महेश माळवतकर :१ एप्रिल २००२ ते ५ ऑगस्ट २००२ या कालावधीत चिकलठाणा बाजाराची वसूली कोणी केली याची माहिती प्रशासनाकडे आहे का?

मा.महापौर : या कालावधीत वसूली ठेकेदाराने केली की, महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी.

मा. आयुक्त :अहवालात दिलेले आहे की ही वसूली कोणी व कुणाच्या मार्फत करण्यात आली. याचा बोध होत नाही. आता मूख्य लेखा अधिकारी यांना सूचना करू की त्या कालावधीमधे बुकींग झाली की नाही.याबध्दल ते रिपोर्ट देतील.जर त्या कालावधीतील स.सदस्यांकडे पावती असेल तर ती बघून बुकींग झाली की नाही हे तपासून घेवून माहिती घेता येईल.

श्री. संजय जोशी :त्या कालावधीत बुकींग झाली की नाही लेखा विभागाचे अधिकारी यांना बोलवावे लगेच माहिती मिळेल.

मा. आयुक्त :लेखाविभाग याची नोंद घेईल व बुकींग झालेले आहे की नाही याची माहिती देतील

श्री.भगवान घडमोडे : १०-२० मिनिटांचा वेळ द्या. दूसऱ्या बाबींवर चर्चा करावी.

मा. महापौर :या संदर्भात २० मिनिटाचा वेळ देण्यात येतो लेखा विभागाकडून रेकॉर्ड मागवून घ्यावेत.स. सदस्य श्री. संजय जोशी जे बाजार म्हणतात त्या दिवशी पैसे महापालिकेत जमा झालेले आहे की नाही याची तपासणी करावी.

श्री. संजय जोशी :एप्रिल महिण्यात तारीख ५,१२,१९,२६ मे महिण्यात ३,१०,१७,२४,३१ जून मधे ७,१४,२१,२८ जुलै महिण्यात ५,१२,१९,२६ व ऑगस्ट २००२ या महिण्यात २ असे एकूण १८ बाजार झालेले आहे. एवढ्या बाजाराची वसूली मनपाकडे आहे का त्याची तपासणी करावी.

श्री. कचरू मोरे :एक वर्षासाठी ठेकेदाराने ठेका घेतला ४.६० लक्ष वसूल झाले. मधल्याच काळात वसूली कशी झाली नाही. हा जो शेरा आलेला आहे तो गैर समजूतीतून आलेला दिसतो. हे गैरसमजूतीने अधारीत असावे असे वाटते.

मा. महापौर :स. सदस्य संजय जोशी यांनी ज्या तारखा दिलेल्या आहेत त्या बाजाराची वसूली झालेली आहे का याची तपासणी करावी. आता सन २००३-२००४ मधे ठेका दिला यासंबधी चर्चा करावी.

श्री. माळवतकर महेश :यावर्षाचा ठेका वसूलीला मा.आयुक्तांनी मान्यता दिली असे म्हटले आहे परंतू कुठलाही आदेश त्या ठेकेदाराला दिला नसतांना त्यांनी वर्षभर वसूली केलेली आहे असे या अहवालात म्हटले आहे.अशा पध्दतीने वसूली करता येते का, याचा खूलासा करावा.

उपआयुक्त (महसूल) : संबधीत ठेकेदाराला ठेका देतांना स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली नाही ही वस्तूस्थिती आहे. संबधीत ठेकेदाराकडे जवळपास ३,२९ लक्ष रक्कम होती. संबधीत ठेकेदाराची अनामत रक्कम रूपये ५० हजार जप्त करण्यात आली असून उर्वरीत २,७९ लक्ष रूपये अदयापही वसूली झाले नसल्यामूळे संबधीत ठेकेदार

श्री.दुर्रानी रजा मो खान व आणि शे. मसूद शे. महेमूद यांचे विरूधद पोलीसात गुन्हा नोदविला आहे.

श्री.संजय जोशी : श्री.दुर्रानी यांचेकडे थकबाकी असतांना त्याचे विरूध्द पोलीस स्टेशनला गून्हा नोद केली असतांना त्याना पून्हा दूसऱ्या बाजाराचा ठेका दिलेला आहे.

उपआयुक्त (महसूल) : श्री.दुर्रानी रजा मो. व शे. मसुद शेख महेमूद यांना सन २००३-२००४ मधे ठेका दिलेला होता. संबधीत ठेकेदारानी महानगरपालिकेची आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न केला म्हणून प्रशासनाने सन २००६ मधे त्याचेवर गुन्हा दाखल केलेला आहे.

श्री. संजय जोशी : यावरून प्रशासनाचे किती दुर्लक्ष आहे हे दिसून येते की श्री.दुर्रानी यांचे कडे पीरबाजार संदर्भात सन २००३-२००४ या वर्षाचे थकबाकी असतांना त्यांना दिं. १.४.२००४ ते ३०.६.२००४ पर्यत मूदतवाढ देण्यात आली. नियम असा आहे एक वेळ जर कुणी थकबाकी दार असेल तर दुसऱ्यादा त्या व्यक्तीला बाजार देण्याचा प्रश्नच येत नाही तरी देखिल पुन्हा चिकलठाणा बाजाराचा सन २००४ चा ठेका परत त्यांना देण्यात आला.

श्री.माळवतकर महेश : एखादा ठेकेदार मागिल सन २००३ ची रक्कम महानगरपालिकेची बुडवतो ठेका बुडवण्यासाठी घेतो. अधिकारी तपासत नाही का? गंडावण्यासाठी जे मदत करतात त्यांचेवर कार्यवाही करावी. २००३ साली बुडवले त्याकडे लक्ष नाही. सन २००३, २००४ व २००५ साली काय केले. २००२ साली बुडवतो. ठेकेदाराचे नांव बघुन पुढे जातो.लागेबांधे आहेत का.दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे.

श्री. सतीश कटकटे :संबधीत ठेकेदार यांचेवर गुन्हा दाखल केला. पून्हा त्याच ठेकेदाराला ठैका देण्यात येतो. ठेकेदारावर गुन्हा दाखल होतो अधिकाऱ्यावर होत नाही का. का केला नाही.

श्री. प्रशांत देसरडा :यात असे म्हटले आहे की विना निविदा ठेकेदारास काम देण्यात आलेले आहे.ठेकेदारावर गुन्हा दाखल करून त्याच ठेकेदारास पून्हा ठेका दिलेला आहे. जी अनामत रक्कम घेतली जाते ती महानगरपालिकेकडे जमा आहे का की ठेकेदारास परत केली.विना निविदा ठेका दिल्या जात आहे हे स्थायी समितीस कळविले होते का जोपर्यत खातेनिहाय चौकशी करीत नाही तोपर्यत कार्यवाही करता येणार नाही असे मा. आयुक्तांनी म्हटले . खुलासा मागविला असता अमुक प्रकरणात संबधीत कर्मचाऱ्यास निलंबीत केले आहे हे प्रशासनाला सांगावे लागते त्यासाठी यात काही गरबड होवू नये म्हणून विनंती की प्रशासनाने कोणत्या प्रकरणात कोणते अधिकारी कर्मचारी यांचेवर कार्यवाही केली याचे एक बूक ठेवावे लागेल.

श्री. संजय जोशी :सन २००४-०५ मधे सूध्दा दिनांक १६.६.२००४ ते १०.९.२००४ या कालावधीत वसूली कोणी केली हे निदर्शनास आलेले नाही. आताच मी जूनच्या बाजारच्या तारखा दिलेल्या आहे यात १३ बाजार येतात एका बाजाराची आधारभूत किमंत १३,१११/-रू. प्रमाणे १,७०,४४३रू होतात. ही रक्कम सुध्दा जमा झालेली आहे की नाही याचाही खूलासा करावा. या संबधीच्या तारखा पण प्रशासनाकडे दिलेल्या आहे.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :माझे असे मत आहे की प्रशासनाचा यावर अभ्यास नाही.

श्री. वसंत नरवडे :या अहवाल असे दिले की निविदा पध्दतीस स्थायी समितीची सुध्दा मंजूरी घेतलेली नाही.करारनामा केलेला नाही. करारनामा नसतांना वसूलीचे अधिकार देता येतातकी याची सूध्दा चौकशी झाली पाहिजे व कुणाच्या अधिकारात दिले गेले आहे.

मा. महापौर :या बाबत अगोदरच चर्चा झालेली आहे आपण सभागृहात उशीर आलेले आहात. मा. आयुक्तांनी खूलासा केलेला आहे स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. असे म्हटले आहे.

श्री. मुजीब खान :जो अहवाल समोर सादर केलेला आहे या कालावधीत कोणते अधिकारी कार्यरत होते.त्यांचे नाव अहवालात यावयास पाहिजे त्याची चौकशी होवून आजपर्यंत काहीही कार्यवाही केलेली नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे :बाजाराचा ठेका दिला स्थायी समितीची मान्यता घेतलेली नाही. कुणाच्या अधिकारानूसार कार्यवाही केली. चुक कूणाची आहे याचा खूलासा व्हावा.करारनामा केलेला होता का याचा सूध्दा खूलासा करावा.

श्री. संतोष खेंडके :मा. आयुक्तांना अभ्यास करण्यासाठी २० मिनिटाचा वेळ देण्यात यावा. तोपर्यंत सभा तहकूब करावी.

मा. महापौर :सभा अर्धा तासासाठी तहकूब करण्यात येते.

(सभा तहकूब दु. २.१५ वाजता पून्हा सभेला सुरूवात दु. ३.३५ वा.)

मा. महापौर :स. सदस्य श्री.जोशी यांनी जे म्हटले होते की मधल्या काळात वसुली कूणी केली ज्या तारखा दिलेल्या होत्या त्या बाजाराची वसूली झालेली आहे का त्या बाबतीत खूलासा करावा.

लेखाधिकारी :बाजाराची ज्या तारखेस पावती फाडण्यात येते, त्यादिवशी किंवा त्या तारखेच्या दुसऱ्या दिवशी रक्कम भरणा केलेली आहे की नाही. त्याची तपासणी कॅश रजिस्टरला करीत आहे.

श्री. संजय जोशी :बाजाराचा दिवस हा शुक्रवार असेल शनिवार रविवार सुट्‍टी असेल किमान सोमवारी तरी त्या बाजाराची रक्कम भरणा होणे आवश्यक होते. ती भरणा केलेली आहे का ?

श्री. मुजीब खॉन :पान क्र १,२,३ वर तीनही वर्षाचा बाजार वसूली संदर्भात जवळपास सारख्याच त्रुट्या आहे. प्रशासनानेही चूक मान्य केलेली आहे. या संदर्भात कार्यवाही करायची त्या बाबतीत निर्णय घेण्यात यावा.

श्री. महेश माळवतकर :ज्या ज्या अधिकाऱ्याच्या कालावधीत भ्रष्टाचार झालेला आहे त्या अधिकाऱ्याचे कर्मचाऱ्याचे नाव अहवाल यावयास पाहिजे होते.

श्री. गजानन बारवाल :सर्व अहवाल आपल्या समोर आलेला आहे.एक सारख्याच चूका झालेल्या दिसून येत आहे. काय निर्णय घ्यायचा तो घेण्यात यावा.दोषीवर कार्यवाही झाली पाहिजे असे माझे मत आहे.

मा. महापौर :आताच स. सदस्यांनी म्हटले की सर्व बाजाराच्या बाबतीत सारख्याच चूका आहे या संबधी कूणास चर्चा करावयाची असेल तर करावी.

श्री. संजय जोशी : रक्कम जमा झाल्याची कॅश बुक मालमत्ता विभागाकडे असते त्यानंतर तीच नोंद लेखा विभागात खतवली जाते. मालमत्ता विभागाकडून कॅश बुक मागवावे त्यात नोंद असते. रजिस्टर मागवावे.

श्री. महेश माळवतकर :पान क्र ५ दिले आहे.ज्या ठेकेदारास जाफरगेटचा बाजार मिळाला त्यानंतर तो आठ दिवसातच २० तारखेला तो मरण पावला .असे असतांना अधिकारी त्याचेच नावाने आठ महिने नोटीस पाठवित होते. यावरून प्रशासनातील अधिकारी किती कार्यक्षम आहे हे दिसून येते. त्या काळात कुणी बाजाराची फि वसूल केली. व तो मरण पावल्यानंतर सुध्दा नोटीसा कुणी पाठविल्या याचा खूलासा करावा.

श्री. संजय जोशी :श्री. अख्तर हुसेन नावाचे ठेकेदार याचा मृत्यू २०.४.२००३ रोजी झाला त्याचे प्रमाणपत्र ऑडीटसाठी मागविलेल्या संचिकेला आहे तरी सूध्दा २६.१२.२००३ पर्यत त्यांचे नावाने वसूली होत होती.त्या ठेकेदाराच्या वारसाने बाजाराची वसूली केली थकबाकी आता कुणाकडून वसूल करायचे असे प्रशासनाचे म्हणणे आहे. ज्यांनी बाजाराचे वसूली केली त्यांचेकडून वसूल करावे.

उपआयुक्त (महसूल) : सदर ठेकेदाराचा मृत्यू झाल्याचे समजल्यानंतर त्याचे जे वारस आहे त्यांचे विरूध्द प्रशासनाने वसूलीची कार्यवाही सूरू केलेली आहे.

श्री. संजय जोशी :दिनांक ३१.३.२००४ रोजी संबधिताने महापालिकेकडे रूपये ७.०२ लक्ष इतकी रक्कम भरणा केली असे दिले ते मयत झाल्यानंतर त्यांनी रक्कम भरलेली आहे का? रक्कम कुणी भरलेली आहे याचा खूलासा करावा.

श्री. माळवतकर महेश :संबधीत ठेकेदार मरण पावल्यानंतर त्याचे वारसांना बाजाराची वसूली करण्याची परवानगी दिलेली होती का? परवानगी दिली असेल तर कूणी दिली.

श्री. संजय जोशी :प्रशासनाची चूक आहे हे सर्वाच्यासमोर आले पाहिजे. चर्चा खूप झालेली आहे. प्रशासन खुलासा करू शकले नाही. आता मा. महापौर सांगतील तो निर्णय आम्हाला मान्य राहिल असे प्रशासनाने मान्य करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री. महेश माळवतकर :जे जे अधिकारी कर्मचारी महानगरपालिकेचे नूकसान करतात त्यांचेवर आज कठोर कार्यवाही करण्याची गरज आहे. आठ तारखेला मा.आयुक्त यांनी संबधीत ठेकेदार याना ठेका दिला २०.४.२००३ रोजी संबधीत ठेकेदार मरण पावला, मरण पावल्यानंतर त्या बाजाराचे ७.०२ लक्ष रक्कम कूणी भरणा केली त्यांना कूणी अधिकार दिले होते वसूलीचा ठेका कुणास दिला व कोणी वसूली केलेली आहे.याचा खूलासा करावा.हे प्रशासनास माहित नसेल तर सर्वच विभागात असे प्रकार होत असतील तेही काढावे लागतील.

श्री.गजानन बारवाल : सन २००३-०४ मध्ये निविदा १२,०४,५०० ची रू.१२,१९,५००/- असे १५,०००/- जास्त दिले.

उपआयुक्त,(म) :संबधीत ठेकेदार मरण पावल्यानंतर बाजाराची वसूली करण्याचे अधिकार कूणी दिले या संबधी श्री.डी.ए.गिरी यांची या संदर्भात अगोदरच चौकशी सुरू करण्यात आलेली आहे. मयत ठेकेदारानंतर कुणी पैसे भरणा केले याची संचिकेत नोंद नाही.

श्री. संजय जोशी : सन २००२ पासून चौकशीच चालू आहे काय? दोन तीन वर्ष चौकशी साठी लागत असतील तर योग्य नाही. सभागृहाची दिशाभूल होईल असा खूलासा प्रशासनाने करू नये. चूक झालेली आहे सरळ प्रशासनाने सांगावे.

श्री. महेश माळवतकर :यावरून असे लक्षात येते की सर्व बाबी हया मा.आयुक्तांच्या मंजूरीने झालेल्या आहे. स्थायी समितीला अंधारात ठेवून विना मंजूरी निविदा काढल्या जाते. अशा अधिकाऱ्याना आजच कार्यवाही केली पाहिजे.

श्री. हिम्मतराव दाभाडे :या अहवालावर आम्ही सदस्यांनीअभ्यास केलेला आहे. दोन तीनवर्षाचे अहवालावर एकदम चर्चा करून निर्णय घेणे योग्य होणार नाही. या अहवालात अनेक त्रुटया दाखविल्या आहेत. या अहवालानूसार जे जे अधिकारी कर्मचारी दोषी असतील त्यांना त्वरीत निलंबीत करावे.जेणे करून पून्हा असे प्रकार होणार नाही.

श्री. अ.रशिद खान : किती दिवस देणार. त्यास त्यावेळचे आयुक्त जबाबदार नाही का?

श्री.भगवान घडमोडे : चांगल्या प्रकारे चर्चा केली . काही सदस्य जेष्ठ व अनुभवी असतांना चर्चेला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न करीत आहे. यासभागृहाच्या भूमिकेमूळे अधिकारी फायदा घेत गेलेले आहे. ३-३ वर्ष चौकशी चालते का याचा खूलासा करावा. तीन वर्षात चौकशी का झाली नाही. मा. आयुक्त चांगले काम करतात परंतू माझ्या मते अधिकारी त्यांना मिसगाईड करतात. मा. आयुक्तांनी या बाबतीत ठोस निर्णय घ्यावा व कार्यवाही करावी. आम्ही सोबत आहोत.

श्री.प्रशात देसरडा :चौकशी कोण करीत आहे याची सभागृहाला माहिती दयावी. चौकशीची मर्यादा किती दिलेली आहे.

श्री. संजय सिरसाट :हा अहवाल मा. आयुक्तांनी वाचला असेलच प्रशासनाचे या विषयी मत काय आहे याचा खूलासा घेण्यात यावा.

श्री. वसंत नरवडे :पान क्र २७ वर या लेखा परीक्षणाचा गोषवारा दिलेला आहे. यात एकूण १३ दोष काढलेले आहे. या संदर्भात त्या त्या काळात जे अधिकारी होते त्याचेवर कार्यवाही करावी व जी वसूली बाकी आहे ती संबधीत ठेकेदार आहे त्यांचेकडून वसूल करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश करावेत. पान क्र.२७ वरिल दोष कायम करा. ठेकेदाराकडून वसूल करावे.

मा.महापौर :मा. आयुक्त यांनी खूलासा करावा.

मा. आयुक्त :माहितीसाठी खूलासा करीत आहे. दिनांक २१.४.२००४या संदर्भात तत्कालीन आयूक्त यांनी चौकशीचे आदेश दिलेले आहे. यात नेमके सादर करता अधिकारी कोण व खाते निहाय चौकशी अधिकारी कोण आहे . महानगरपालिकेचे अनेक प्रकरणाची चौकशी प्रलंबीत आहे म्हणून मागिल महिण्यात मी आदेशीत केले होते की जेवढे प्रकरण चौकशीचे चालू आहे त्याचा आढावा घेवून कमी वेळात कसे निकाली काढता येतील त्यासाठीकार्यवाही सूरू केलेली आहे.या कमेटीत मुख्यलेखा परीक्षक तसेच दोन्ही उपआयुक्त असून अशा प्रकरणामधे कार्यवाही करीत आहे. वस्तूस्थिती आहे की २००४ मधे डीई चे आदेश देवूनही आतापर्यत डीई पूर्ण झालेली नाही. यात एकूण १५ कर्मचारी येतात त्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. नोटीसची मूदत ही २१ ,२२ तारखेला संपणार आहे या महिना अखेर कार्यवाही पूर्ण करून सर्वसाधारण सभेपूढे अहवाल देण्यात येईल.तशी मूदत सभागृहाने दयावी. वेगळे काही निर्णय या सभागृहाला अधिकाऱ्या बाबत ध्यायचे असेल तर ते घ्यावे. माझ्या मते प्रशासनाला पूर्णपणे चौकशी साठी वेळ दयावा.

श्री. संजय जोशी :तीन वर्षापासून चौकशी का झाली नाही हा विषय होता. आता पून्हा मूदत कशासाठी पाहिजे.

मा. आयुक्त :अनेक प्रकरणा चौकशी करण्यास विलंब झालेला आहे. त्या सर्व प्रकरणाची यादी करून आता पून्हा चौकशी करण्या संदर्भात ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी समिती नियूक्त केलेली आहे. अनेक कर्मचारी अनेक दिवसापासून निलबीत आहे त्यांना ७५ टक्के पगार पण दिला जातो. या महिना अखेर पर्यंत प्रथमदर्शनी कार्यवाही करून अहवाल सभागृहापूढे ठेवण्यात येईल.

श्री. संजय जोशी : लेखा परीक्षणा संबंधी अर्धसमास पत्र देवूनही तपासणीसाठी संचिका उपलब्ध करून दिल्या नाही, त्याचे उत्तर संबंधीतांनी दिले नाही. अशा अधिकारी कर्मचारी यांचेवर काय कार्यवाही केलेली आहे. प्रशासनाने त्या कर्मचाऱ्याना फक्त नोटीसा दिलेल्या आहे. आता आयुक्त म्हणतात की मी चौकशी करून पूढील सभेत अहवाल सादर करण्यात येईल हे बरोबर वाटत नाही. बाजाराची वसूली केली त्याची पावती माझ्याकडे आहे. त्यांचे रेकॉर्ड महानगरपालिकेकडे कूठेच नाही. अहवालात पावतीचा उल्लेख नाही.

मा.आयुक्त : पावतीची नोंद तपासण्यात येईल.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :माझ्या माहिती प्रमाणे सर्व खोटया पावत्या छापून वसूलीचे काम झालेले दिसते.

श्री. सतीश कटकटे :पान क्र ६ वर मालमत्ता अधिकारी यांनी रू. २६,२०० प्रति बाजार या प्रमाणे ३० बाजारासाठी अशा वसूली बाबत प्रस्तावित करण्याऐवजी संचिकेतील टिपणी मध्ये संबधति मालमत्ता अधिकारी यांनी प्राप्त दराचा उल्लेख न करता रू. २५,३५५ दराने प्रति बाजार प्रस्ताव सादर करून मा. आयुक्तांनी मान्यता घेतल्याचे निदर्शनास आलेले आहे. मालमत्ता अधिकारी यांनी त्यांचे मनाने का ही रक्कम टाकलेली होती.

श्री.कैलास गायकवाड : पान क्र ६ वर श्री. अब्दुल रफीक अ.रहिम यांना दिं. १२.९.२००४ ते ३१.३.२००५ पयैत ७.६० लक्ष रूपये भरण्यास सांगितलेले होते. जो लेखा

परीक्षक यांनी अहवाल दिला तो दिशाभूल करणारा आहे. संबधीत व्यक्तीने दिनांक १३.४.२००४ रोजी १.५० लक्ष रक्कम मनपाकडे जमा केलेली आहे. त्यानंतर २९.३.२००४ रोजी रूपये २.५० लक्ष मनपाकडे जमा केलेले आहे. तसेच दिनांक २६.८.२००५ रोजी रू. ३.६०,६५० अशी एकूण ७.६० लक्ष एवढी रक्कम महापालिकेकडे भरणा केलेली आहे. या अहवालत संबधीताने ३१.३.२००५ पर्यंत फक्त १.५० लक्ष रूपये रक्कम भरणा केली असे नमूद केलेले आहे. हा अहवाल चूकीचा दिलेला आहे आणि जे संबधीत लेखा परीक्षक अधिकारी आहे यांनी संपूर्ण सभागृहाची दिशाभूल केलेली आहे म्हणून मुख्य लेखा परीक्षक श्री.औताडे यांचेवर कार्यवाही करावी. या प्रकरणाची नागपूर कार्यालयाकडून चौकशी करून घ्यावी.

श्री. सतीश कटकटे :आताच स. सदस्य जे बोलले त्या ठेकेदाराने बोगस धनादेश दिलेले होते. वसूली झालेली नाही. धनादेश वटला नव्हता.

श्री. संजय जोशी :कॅश रक्कम संबधीत ठेकेदाराने भरलेली नाही. धनादेश दिले असतील वटवले गेले नाही.

श्री. मुजीब खान :संबधीत ठेकेदाराने रक्कम महापालिकेकडे जमा केली असेल परंतू कर्मचारी यांनी ती रक्कम हडप केली असेल व बोगस पावत्या दिल्या असतील त्यामूळेच लेखा परीक्षण अहवाल आलेले नसेल.या बाबतीत चौकशी होणे गरजेचे आहे अनेक प्रकरणात असे झाले आहे की कर्मचारी कर धारकांना पावत्या देतात ती रक्कम महापालिकेच्या रेकॉर्डवर कमी दाखविलेली असते.

मा. आयुक्त :यात मला पण असे वाटते गैरव्यवहार होण्याची शक्यता आहे. या महिन्या अखेर पर्यंत पूर्ण चौकशी करून अहवाल देतो.

श्री. सतीश कटकटे :रूपये २५,३५५ प्रमाणे एक बाजाराचा ठेका कोणत्या अधिकाऱ्यानी दिलेला होता.याचा खूलासा करावा.

श्री. प्रशांत देसरडा :पान क. ८ वर अ.क्र. ६ मध्ये सन २००२-२००३ या वर्षासाठी सावंगी तलाव माती विक्रीचा ठेका श्री. रशीद पटेल यांना देण्यात आला होता. परंतू यात निविदा मागविण्यात आलेल्या नव्हत्या. याची चौकशी व्हावी.

श्री. कचरू मोरे :जो अहवाल सादर केलेला आहे यात फक्त मालमत्ता अधिकारी यांना जबाबदार धरलेले आहे. परंतू त्यावेळचे उपआयुक्त व वरीष्ठ अधिकारी सूध्दा जबाबदार आहे.

श्री. मुजीब खान :पान क्र २७ वर १ ते १३ नूसार संपूर्ण दोष काढलेले आहे. सुरूवातीपासून शेवटपर्यत एक सारख्याच चूका दिसून येत आहे. या संबधी अधिकारी दोषी आहे. या बाबतीत चौकशी साठी वेळ देवून त्या त्या संबधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात आली पाहिजे.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :जाफरगेट बाजार संबधी ठेकेदाराने धनादेश क्र ०४४१८७ दिं. १७.३.२००५ र.रू.६,१०,६५०/-तो धनादेश कोणत्या बॅकेचा होता व वटलेला आहे का याची माहिती दयावी.तसेच धनादेश वटलेला नसता,त्याच ठेकेदारांना ठेका दिला का?

मा. महापौर :उपआयूक्त महसूल यांनी खूलासा करावा.

उपआयुक्त(म): :आताच विरोधी पक्ष नेते यांनी ज्या धनादेशाचा उल्लेख केला तो वटलेला नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : माझ्या माहिती प्रमाणे धनादेश वटलेला नसतांना त्याच ठेकेदारास पून्हा ठेका देण्यात आलेला आहे.तसेच पान क्र ८ वर क्र ३ मध्ये सन २००४-२००५ मधे अ.साजेद अ.हमीद असे नाव आहे ही व्यक्ती कोण आहे.राहतात कूठे माहिती साठी विचारणा केलेली आहे प्रशासनाने नोंद घ्यावी.

श्री. कोकाटे काशिनाथ : जाहीरात फलक यातून जास्तीत जास्त उत्पन्न होत असते. यातून जवळपास ३ ते ४ कोटीचे उत्पन्न महापालिकेस होते. परंतू एवढे मोठे शहर असतांना इतर शहराचा विचार केल्यास यातून येणार उत्पन्न अत्यल्प आहे असे माझे मत आहे. यात मोठा

भ्रषटाचार होत असल्यामूळे उत्पन्न कमी येत आहे तीन एजन्सीज काम करीत आहे. शहरात मोठमोठया कमानी करण्यासाठी सेल अॅड एजन्सीला काम देण्यात आले होते. तीनही एजन्सीला दिलेल्या कामाची मूदत संपलेली आहे. सेलअॅड कंपनीने अदयाप महापालिकेस पैसे भरणा केलेले नाही. प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे म्हणून कुठलीही दखल प्रशासनाकडून घेतलेली नाही. न्यायालयाने दिलेले जैथे थे चे आदेश जे जेवढ्या कालावधीचा करार असतो त्यासाठी ते आदेश ग्राहय धरता येतील. नंतर नाही. असे असतांना देखील संबधीत एजन्सीच काम करीत असून जाहीरात फलकाचे पैसे जमा करीत नसेल तर योग्य नाही. काही एजन्सीचा करारनामा मुदत संपलेली आहे प्रशासनाकडे मी पत्र दिलेले होते. त्यावर मला उत्त्तर मिळाले की सदर एजन्सीला मा. आयुक्तांनी मुदतवाढ दिलेली आहे. त्यामधे ३१ लक्ष रक्कम वाढविलेली आहे. मुदतवाढ देण्याची गरज नव्हती. त्यावेळी आचारसंहिता नव्हती. जाहीरात देवून कार्यवाही करावयास पाहिजे होती ती केलेली नाही. मुदतवाढ केंव्हा दिली व किती दिवसासाठी दिली याचा अहवाल स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभैसमोर अदयाप आलेला नाही. सदर एजन्सीने क्रांतीचौक तसेच पेठण गेट येथे मोठमोठे होर्डींग लावलेले आहे. त्यातून १० लक्ष मिळावे महापालिकेत ती रक्कम जमा झालेली नाही. त्या होर्डींगमूळे रहदारीस अडथळा होतो आपण काढण्याचे आदेश देवूनही कार्यवाही होत नाही या मागचे रहस्य काय आहे. तसेच आकाशवाणी समोरील कमान ही काढण्याचे आपण आदेशीत केले होते स्थायी समितीमधे ही निर्णय दिला होता अदयाप कार्यवाही केलेली नाही. यावरून भ्रष्टाचाराची सुई प्रशासनाकडे जाते.प्रशासनातील अधिकाऱ्याच्या आर्शिवादा शिवाय हा भ्रष्टाचार होवूच शकत नाही. ही अत्यंत गभीर बाब असून जे उत्पन्न महापालिकेत यायचे ते येत नाही. जर होर्डींग बाबत ओपन कॉम्पीटेशन झाले तर लाखो चे उत्पन्न महापालिकेस येईल. परंतू त्या प्रकारे कार्यवाही का होत नाही. याचा खूलासा प्रशासनाकडून घ्यावा.

श्री. प्रशांत देसरडा :शहरातील काही होर्डींग धारक न्यायालयात गेले व न्यायालयाने असा निकाल दिला की पाच वर्षा ऐवजी दोन वर्षाचे ठेका दयावा . त्यानूसार राज्य शासनाने एक जी. आर सूध्दा काढलेला आहे. परंतू प्रशासनाने पाच वर्षासाठी टेंडर काढून चूक केलेली आहे व या सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. माझा स्पष्ट आरोप आहे की करारनामा मधे दिलेले नॉर्मस् व टेंडर मधे असलेले नॉर्मस् हे वेगवेगळे आहे. मा.आयुक्त यांना विनंती की त्यांनी जातीने याची चौकशी करावी जेणे करून करारनामा व टेंडर नोटीस मधे तफावतझालेली दिसून येईल.जेंव्हा अहवाल सादर केला तेंव्हा संबधीत ठेकेदार यांचेकडे १९.४० लक्ष इतके बाकी होते.दुसऱ्या वर्षाचे ४६.७२ लक्ष होतात. व तिसऱ्या वर्षाचे ५०.४१ लक्ष इतकी रक्कम होते.असे एकूण १.१६ कोटी संबधीत ठेकेदाराकडून आजरोजी येणे आहे यावर १८ टक्के प्रमाणे व्याज आकारले तर किमान १.२० कोटी रूपये होतात. प्रशासनाने कार्यवाही केल्यानंतर संबधीत ठेकेदाराने फक्त १० लक्ष रूपये भरणा केलेले आहे.तरी आज रोजी १.१० कोटी रूपये आणखी संबधीत ठेकेदाराकडे बाकी आहे. वसूली का करीत नाही म्हणून विचारणा केली तर असे सांगण्यात येते की हे न्यायप्रविष्ठ प्रकरण आहे. परंतू न्यायालयाने संबधीताकडून थकबाकी वसूल करू नये असे कुठेही निकालात म्हटलेले नाही. न्यायालयाच्या निर्णयानूसार दोन वर्षाचाच ठेका असावयास पाहिजे आज सदर ठेका देवून तीन वर्ष पूर्ण झालेले आहे. आता ४ थे वर्ष सूरू झाले या वर्षाचे आणखी थंकबाकीमधे ६१.६७ लक्ष रूपये होतात. एखादे कामाचे अंदाजपत्रक लेखा विभागाकडे गेल्यास बजेट नाही म्हणून शेरा येतो परंतू

संबधीत ठेकेदाराकडे १.२० कोटीची थकबाकी असतांना प्रशासन कोणतीच कार्यवाही करीत नाही कशासाठी त्यास सवलत देण्यात येत आहे. न्यायालयाचे आदेश दोनच वर्षासाठी ठेका दयावा असे असतांना तिसऱ्या वर्षाचा ठेका कूणाच्या आदेशाने दिलेला आहे व न्यायालयाचे आदेश काय आहे विधी सल्लागार यांनी खूलासा करावा.

श्री. कैलास गायकवाड :निविदेमध्ये दिलेल्या अटी व करारनामा मध्ये दिलेल्या अटी शर्ती काय आहे याचा खूलासा घेण्यात यावा.

मा. महापौर :न्यायालयाचे आदेश काय आहेत त्याचा विधी सल्लागार यांनी खूलासा करावा.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : संबधीत ठेकेदाराकडे असलेली रक्कम न घेता त्यास पूढील ठेका दयावा असे न्यायालयाचे आदेश कधीच नसतात. न्यायालयात विधी सल्लागार मार्फत काय कार्यवाही झालेली आहे. ज्या ठेकेदाराकडे थकबाकी होती त्यांनी आजपर्यंत का भरणा केलेले नाही. मा.न्यायालयाला सांगितले का, संबधीत ठेकेदाराकडून रक्कम वसूल होणार नसेल तर कायदेशीर कार्यवाही प्रशासनाने करावी. सदर एजन्सीला निलंबित करण्यात यावे.

उपआयुक्त (महसूल) : स.सदस्य श्री.कोकाटे व स.स.श्री.देसरडा यांनी सेलॲड कपंनी संदर्भात काही मूद्दे उपस्थित केले.सदर कंपनीस महापालिकेने दिं.१.७.२००३ ते ३१.६.२००५ असे दोन वर्षासाठी ठेका दिला होता. या एजन्सीने महापालिकेस सूरूवातीत १९.४० लक्ष एवढी रक्कम भरल्यानंतर त्यानंतरची रक्कम भरण्यासाठी प्रतिसाद दिला नाही. त्यामूळे सदर एजन्सीचा करारनामा रद्य करून नव्याने कार्यवाही करण्यास सूरूवात केली. दरम्यानच्या काळात संबधीत एजन्सी न्यायालयात गेली व जी थकबाकी महापालिकेची रूपये ४३.५० लक्ष होती ती वसूल होवू शकती नाही. सदर कंपनीचे पिटीशन जिल्हा न्यायालयाने फेटाळले व महापालिकेने जे करारनामा रद्य करण्याची कार्यवाही केली आहे ती न्यायालयाने कायम केली. व जी वसूली आहे ती वसूली करण्याची कार्यवाही चालू ठेवावी असे आदेश दिले. त्यानंतर प्रशासनाने सदर एजन्सीचे जे मोक्याचे ठिकाणे होर्डीग होते ते काढण्याची कार्यवाही सूरू केली. व संबधीत एजन्सी मा.उच्च न्यायालय हे प्रकरण दाखल केले व मा.उच्च न्यायालयाने यास स्थगिती दिली. दरम्यानच्या काळात प्रशासनाने संबधीत एजन्सीकडील बँक गॅरटी ही ३ लक्षची होती ती रक्कम महापालिका फंडात जमा केली. तसेच न्यायालयाकडे पाठपूरावा करून संबधीत एजन्सीकडून १० लक्ष एवढी रक्कम भरणा करून घेतली न्यायालयाने असे आदेश केले की जो वाद महापालिका व संबधीत एजन्सीमधे आहे तो एका स्वतंत्र अरबी ट्रेटर नियुक्ती करून सोडविण्यात यावा. त्यानंतर एका अरबी ट्रेटरची नियुक्ती केली होती,परंतू त्यांनी नियुक्ती पत्र स्विकारण्यास नकार दिला. त्यानंतर निवृत्त न्यायमूर्ती श्री.नरेंद्र चपळगावकर याची नियुक्ती करण्यात आली त्यांचेकडे प्रशासनाने सर्व मुद्ये माडलेले आहे. उपआयुक्त (महसूल) या स्तरावर साधारण फेब्रवारी मधे ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबधीत कंपनीचा ठैका रद्य झाला असल्यामूळे नवीन निविदा काढता येईल किंवा कसे असे विधी विभागाकडे विचारणा केली असता नवीन निविदा काढता येणार नाही असे स्पष्ट अभिप्राय प्राप्त झाले आहे.

श्री. देसरडा प्रशांत :संबधीताकडून किती रक्कम येणे आहे. ती वसूल करू नये असे न्यायालयाचे आदेश आहेत का ?असेल तर त्याची प्रत सभागृहात दाखवावी. तसेच आजपर्यंत संबधीत ठेकेदाराकडून किती रक्कम येणे आहे याचा खूलासा करावा.

मा. महापौर :विधी सल्लागार यांनी या संबधी खूलासा करावा.

विधी सल्लागार : सेलअॅड कंपनीचे करारनामा रद्य केल्यानंतर प्रकरण मा.जिल्हा न्यायालयात दाखल झाले मा.जिल्हा न्यायालयाने संबधीत एजन्सीचे पिटीशन फेटाळले. त्यानंतर संबधीत एजन्सी यांनी मा.उच्च न्यायालयात प्रकरण दाखल केले व न्यायालयाने असे आदेश केले जो पर्यत आरबीट्रेशन होत नाही तोपर्यत जैसे थे परीस्थिती ठेवावी. आरबीट्रेशन म्हणून निवृत्त न्यायमूर्ती श्री.नरेद्र चपळगावकर यांची नियुक्ती केलेली आहे. त्याचे समोर प्रकरण अंतीम सूनावणीसाठी आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : जैसे थे परीस्थिती म्हणजे काय होती याचा खूलासा करावा.

विधी सल्लागार :रिनीव्हल करता येणार नाही तसेच नवीन होर्डीग लावता येणार नाही व काढून टाकता येणार नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : याचा अर्थ काय आहे. गंभीर बाब आहे. संबधीत एजन्सीचे इन्कम चालू राहणार आहे का?आता सध्या संबधीत एजन्सी पैसे वसूल करीत आहे,ते पैसे कूठे जमा करतो.

विधी सल्लागार : इन्कम चालू राहणार नाही. संबधीत एजन्सी फलक लावत असेल तर ते अतिक्रमण आहे ते थांबवावयास अडचण नाही.

श्री. कोकाटे काशिनाथ : एका वर्षानंतर सुरू. ६१ लाख भरले नाही. १० लाख जमा केले.

श्री. देसरडा प्रशांत : संबधीत एजन्सीकडून थक्बाकी वसूल करू नये असे मा.न्यायालयाचे आदेश आहे का याचा खूलासा करावा.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : जे आर्बीट्रेटर नियुक्त केलेले आहे. ते कुणाच्या आदेशाने नियूक्त केले आहे. ही एजन्सी कूणाची आहे याची पण माहिती दयावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :दोन वर्षासाठी सदर एजन्सी नियुक्त केलेली आहे. एक वर्षानंतर हा वाद कोर्टात गेला. सुरूवातीच १९.४० लक्ष रक्कम संबधीताने भरणा केली त्यांनंतर ४३ लक्ष थकबाकी होती ती न भरल्यामूळे त्याचा करारनामा रद्य करण्याची कार्यवाही सुरू केली म्हणून १० लक्ष रूपये भरणा केले. याचा अर्थ संबधीताकडून पैसे घेण्यास मा. न्यायालयाने रोखलेले नाही.

मा.आयुक्त :१० लक्ष रू हे मा.उच्च न्यायालयात संबधीताकडून जमा करून घेतले.

श्री. देसरडा प्रशांत : संबधीत ठेकेदार कदाचित हे शहर सोडून जाण्याची शकयता आहे त्याची महापालिकेकडे सेक्यूरीटी ३ लक्षची आहे.उर्वरीत रक्कम कोठून वसूल करणार आहे

श्री. कोकाटे काशिनाथ :महानगरपालिकेचे पॅनल बदलण्याचे आदेश प्रशासनास यापूर्वी दिलेले असतांना कार्यवाही होत नाही. परंतू जाणीपूर्वक भ्रष्टाचार व्हावा व कायदयाने कूठलेही काम चालू नये या दृष्टीने जे विधी सल्लागार आहे ते सूध्दा प्रभारी म्हणून काम करीत आहे. प्र.चार्ज किती दिवस असावा या बाबत सूध्दा नियम आहे. परंतू प्रशासन ते पद भरण्या बाबत कार्यवाही करीत नाही.

मा. आयुक्त : सेलअॅड एजन्सीच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाचे स्थगिती आदेश आहे. आर्बीट्रेटरची नियूक्ती करावी म्हणून आहे. जेवढी जागा त्या एजन्सीला दयावयाची होती ती जागा महानगरपालिका देवू शकली नाही म्हणून प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले. व १० लक्ष रूपये जमा करावे व परीस्थिती जैसे थे ठेवावी म्हणून आदेशीत केलेले आहे म्हणून आता वसूली करता येणार नाही. जिल्हा न्यायालयाचे आदेश झाले होते तेंव्हा काही जाहीरात फलक काढलेले होते परंतू संबधीत एजन्सीने कन्टेम केले त्यानंतर मा.न्यायालयाचे जैसे थे चे आदेश मिळालेले आहे.सध्या मॅटर आर्बीट्रेटरकडे असल्यामूळे वसूली करता येणार नाही

मा. महापौर :दोन वर्षासाठी टेंडर दिलेले होते. वाद चालू झाला दोन वर्षाचा कालावधी निघून गेलेला आहे. त्या एजन्सीचा ठैका आपोआप रद्य होवू शकतो. प्रशासनाने वेगळे टेडर काढण्याची कार्यवाही करावयास पाहिजे होती.

मा. आयुक्त :संबधीत एजन्सीला जी जागा दयायची होती ती जागा सोडून दुसऱ्या एजन्सीला जाहीरात फलकसाठी ठेका देवू शकतो.

श्री. प्रशांत देसरडा :टेंडर काढले तेंव्हा जी जागा होती तीच जागा देणार होतो.इतर कोणतीही जागा देणार नव्हतो. असे असेल तर मालमत्ता अधिकारी किंवा उपआयुक्त यांनी खूलासा करावा की कोणती जागा देवू शकलो नाही. १० लक्ष रूपये मा. न्यायालयात जमा केलेले आहे. व उर्वरीत रक्कम वसूल करू नये म्हणून न्यायालयाचे आदेश नाही.

श्री. कैलास गायकवाड :सेलअॅड संदर्भात टेंडर कूणी काढले होते. त्यावेळी कोणते अधिकारी होते. निवेदेमधे काय अटी होत्या व करारनाम्यामधे काय अटी शर्ती दिलेल्या होत्या याचा खूलासा करावा.

श्री. मुजीब खान : सभागृहाची दिशाभूल केली जात आहे. सेलअॅड संदर्भात महानगरपालिकेच्या वतीने मा.उच्च न्यायालयात काय म्हणणे मांडले होते. दावेदारानी काय ऑब्जेक्शन घेतलेले होते. स्थगिती आदेश म्हणजे पुर्वीचे जे जाहीरात फलक लावू नये परंतू संबधीताकडून मागिल वसूल करू नये असे आदेश नाही. दोन्ही बाजूनू मा. न्यायालयात काय जवाब दिलेले आहे याचा प्रथमत: खूलासा करावा.

श्री. पाथ्रीकर दत्तभाऊ :संबधीताने न्यायालयात १० लक्ष रक्कम भरणा केली ती मनपास मिळणयासाठी विनंती केलेली आहे काय याचा खूलासा करावा. दुसरे असे की अ. साजेद ही व्यक्ती कोण आहे कुठे राहते याचा खूलासा दयावा.

उपआयुक्त (महसूल) :अ.साजेद अ.हमीद यांनी महापालिकेच्या बाजाराचा ठेका घेतलेला होता. रेकॉर्ड वरून ते द्वारा: मसकद कन्स्ट्रक्शन मंजूरपूरा औरंगाबाद येथील रहिवासी आहे.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :याची चौकशी करावी. पोलीसातर्फे माहिती घ्या.

उपआयुक्त (महसूल) : सेलअॅड कंपनीमहानगरपालिकेकडे पैसे भरत नाही म्हणून त्यांचे करारनामा रद्य केला होता. त्या विरोधात कंपनी न्यायालयात गेली व महानगरपालिकेच्या वतीने महापालिकेची बाजू व्यवस्थित मांडलेली आहे. सदर एजन्सीने मा.न्यायालयासमोर जी ४३.५० लक्ष रक्कम महापालिकेकडे येणे होती ती जास्त आहे व ज्या टेडंर नोटीस मधे ज्या जागा महापालिका देणार होते त्या देवू शकलो नाही असे मत मांडलेले होते.जेंव्हा टेंडर काढले होते तेंव्हा अपेक्षित २३२ जागा उपलब्ध होतील असे टैंडर काढले होते. व ७४ जागा उपलब्ध करून दिल्याहोत्या त्यापैकी जिल्हा न्यायालयाच्या आदेशानूसार ९ जागावरील फलक काढले होते. आता ६५ जागेवर फलक लावलेले आहे.

श्री. देसरडा प्रशांत : टेंडर ज्या प्रमाणे काढले त्या नूसार तेवढ्या २३२ जागा का देवू शकलो नाही व त्यांनी का घेतल्या नाही. याचा खूलासा करावा.

सौ. लता दलाल :होर्डींग प्रकरण मा. न्यायालयात गेल्यानंतर पून्हा जाहीरात फलकास परवानगी दिलेली आहे काय? किती ठिकाणी दिलेल्या आहे. त्याचे प्रस्ताव मंजूरीसाठी दिले होते का याचाही खुलासा करावा

श्री. अ. रशिद खान :सबधीत एजन्सी न्यायालयात का गेलेली आहे न्यायालयात प्रकरण गेल्या नंतर सदर एजन्सी पैसे भरण्यास तयार नाही असे सांगितले का. थकबाकी भरण्यास तयार नाही म्हणून न्यायालयात प्रकरण गेले. न्यायालयाने रक्कम रूपये १० लक्ष जमा करण्याचे आदेश दिले. उर्वरीत रक्कम भरण्या बाबत काय कार्यवाही आहे.

उपआयुक्त (म.) :सेलअॅड कंपनीला महानगरपालिकेच्या मालकीच्याच जागेवर फलक लावण्या बाबतचे टेडर होते. या व्यतिरिक्त खाजगी मालमत्तेवर होर्डींग लावण्याची परवानगी मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४ नूसार आणि औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र ५७८ दिनांक २३.२.२००२ या नूसार खाजगी जागेवर होर्डींग लावण्या बाबत दर निश्चित केलेले

आहे. जी व्यक्ती कलम २४४ नूसार परवानगी मागविण्यासाठी येते त्याना परवानगी देतो. ही प्रक्रिया २० वर्षापासून चालू आहे. एकूण १८७ लोकांना परवानगी दिलेली असून यामाध्यमातून मनपास सन २००५-२००६ या वर्षात ३१ लक्ष महसूल प्राप्त झालेला आहे.

सौ. लता दलाल :ज्या होर्डीगला परवानगी दिली त्या संबधीचे प्रस्ताव स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली आहे का ?

उपआयुक्त (म) :ठराव क्र ५७८ सन २००२ साली पारीत झालेला असून त्यानूसारच वसूली होत आहे. जे खाजगी होर्डीग आहेत त्यांचेकडून त्या दरानेच वसूली करीत आहोत. हे सर्व लायसन्स या सत्रात येत असल्यामूळे व कलम २४४ नूसार मा. आयुक्त यांचे अधिकारात असल्यामूळे स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभैपूढे प्रस्ताव आलेले नाही. सेलॲड कंपनी वगळता सर्व परवानगी हया खाजगी मालमत्तेवर दिलेल्या आहे.

सौ.लता दलाल :सन २००२ नंतर महानगरपालिकेच्या जागेवर होर्डीग लावण्याची परवानगी दिलेली असेल तर यास जबाबदार कोण असणार आहे.

श्री. कैलास गायकवाड :सेल ॲड केपंनीला ठेका देण्याचे टैंडर कूणी काढलेले होते.टेंडरमधे काय अटी व करारनाम्यामधे काय अटी शर्ती दिलेल्या होत्या.

मा. महापौर :महानगरपालिकेनेच टेंडर काढले होते. जे त्यावेळी अधिकारी असतील ते संबधीत आहे. करारनाम्याची प्रत स. सदस्य श्री. गायकवाड यांना देण्यात यावी.

श्री. शंशाक विसपूते :सेलॲड कपंनीला २३२ जागा उपलब्ध करून दयायच्या होत्या त्यापैकी ७४ दिल्या परंतू ज्या जागेवर लावावयास पाहिजे तेथे लावलेले नाही.ज्या पध्दतीने टेंडर कॉल होणे गरजेचे होते त्या प्रमाणे केलेले नाही. चूक कोणाची झालेली आहे याची चौकशी करावी.हा गंभीर विषय असून यात जवळपास महापालिकेचे १.२५ कोटीचे नूकसान झालेले आहे.

श्री. देसरडा प्रशांत :१५२ जागेचा डाटा संबधीत एजन्सीला प्रशासनाने दिलेला होता. या जागेवर कुठेही अडथळा नाही. असे असतांना मा. न्यायालयात महापालिकेच्या वतीने योग्य ते मत मांडले गेले नाही असे वाटते. संबधीत एजन्सीकडून जवळपास १ कोटी रूपये येणे असून १० लक्ष जमा केलेले आहे ९० लक्ष रूपये महापालिका कोणत्या पध्दतीने वसूल करणार आहे याचा खूलासा करावा.

मा. आयुक्त :सबधित एजन्सीची तीन लक्षची बँक गॅरटी आहे. आर्बीट्रेटरकडून जो निर्णय येईल त्याप्रमाणे कार्यवाही होईल. १० लक्ष रूपये मा.न्यायालयात संबधीत एजन्सीने जमा केलेले आहे.

श्री. देसरडा प्रशांत :मा.न्यायालयाने काय आदेशीत केलेले आहे सभागृहात वाचून दाखवावे.

मा. आयुक्त :बाहेरील तज्ञ वकीलाचा या बाबतीत सल्ला घेवून त्याप्रमाणे वसूली संदर्भात कार्यवाही केली जाईल.

श्री. प्रशांत देसरडा : चांगले व तज्ञ वकीलाचा सल्ला घेवून कार्यवाही करू असा खूलासा केला.मा. आयुक्ताचे अभिनंदन करतो. तसेच शहांगज येथील पेट्रोलपंपची जागा मनपाची असून संबधीत मालकाने करारनामा केलेला नसतांना अग्निशमन विभागाकडून एनओसी कशी देण्यात आली.

श्री. कोकाटे काशिनाथ :या संदर्भात स्थायी समितीमधे चर्चा झालेली होती व त्या संबधीची संचिका मिळत नाही म्हणून मालमत्ता विभागाचा खुलासा होता. ती जागा ४० वर्षापूर्वी भाडे तत्वावर दिलेली होती त्याची लिज मुदत संपलेली असून संबधीत मालकाकडे परवानगी ही जूनी आहे. भाडे सुध्दा जुन्या दरानेच वसूल केले जात आहे नवीन करार केलेला नाही. या संबधीची यादी मागविलेली होती दिनांक १८.०६.२००५

रोजी नोंद करण्यात आली व त्यापूढे असे दिले की ही संचिका मिळत नाही. दीड वर्ष झाले प्रशासनाने त्या बाबतीत ठोस निर्णय घेतलेला नाही. जे पूर्वीचे भाडे ५० रू. प्रति महिना होता त्या प्रमाणेच वसूल होत आहे. संबधीत मालकाने तेथे दुकान भाडयाने दिलेल्या आहे व एका दुकान मागे १०००रूपये भाडे वसूल करीत आहे. अशा अनेक मालमत्ता महापालिकेच्या आहेत. या बाबतीत प्रशासनाचे काय मत आहे खूलासा घ्यावा.

श्री. अ. रशिद खान :ती जागा भाडे तत्वावर दिलेली आहे. कराराची मूदत संपलेली असतांना एनओसी का देण्यात आलेली आहे.दरवर्षी नुतनीकरण कसे केले.

श्री.काशिनाथ कोकाटे :क्रांतीचौक भाग तसेच मोढा नाका येथेही महापालिकेच्या मालकीची जागा भाडेने दिलेली आहे. मोठमोठया जागा असून या संदर्भात स्थायी समितीमधे अनेक वेळा चर्चा झालेली असतांना कार्यवाही केलेली नाही सर्वावर समान कार्यवाही झाली पाहिजे. मोढा नाका हा मुख्य रस्ता असून तो रूंद करणे आवशक आहे रहदारीस अडथळा निर्मान होत आहे. रस्ता रूदींकरणासाठी जागा भूंसंपादन करण्याची गरज नाही असे असतांना ती अतिक्रमणे का हटविली जात नाही.

श्री. अ. रशीद खान : १९७१ ला नगर भूमापन कार्यालयाशी संगणमत करून जागा नावावर करून घेतेलेल्या आहेत. जेथे जागा आहे तेथील व्यक्तीला कागदपत्राची विचारणा करावी कागदपत्र नसेल तर ते अतिक्रमण काढावे. अग्निशमन विभागाने एनओसी कशाच्या अधारे दिलेली आहे.

श्री. मुजीब खान :महानगरपालिकेच्या मालकीच्या किती जागा कोणत्या वार्डात आहेत यादी सर्व सदस्यांना देण्यात यावी. जेणे करून कूठे अतिक्रमण झालेले आहे . ते दिसून येईल. व त्या जागा किती वर्षासाठी लिजवर दिलेल्या आहेत व कशासाठी दिलेल्या आहेत याची माहिती सदस्यांना देण्यात यावी.

मा. आयुक्त :क्रांतिचौक येथील जागे बाबत कार्यवाही चालू आहे. ती जागा ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न सूरू आहे. महापालिकेच्या मालकीच्या जागा किती व कोठे आहे याची माहिती सदस्यांना दिली जाईल परंतू ज्या जागा ४०-५० वर्षापूर्वी लिजवर दिलेल्या आहेत त्याचे रेकॉर्ड सापडत नाही. जर महापालिकेची जागा असेल असे सदस्यांना माहिती असेल तर ती प्रशासनाकडे देण्यात यावी. त्याची चौकशी करून कार्यवाही केली जाईल.

श्री. अ. रशिद खान :नगरपालिकेचे नगराध्यक्ष श्री.अलफखान साहेब यांचेकडे माहिती मिळू शकेल ती प्रशासनाने घेण्याचे प्रयत्न करावे.

सौ. लता दलाल :१३४४ चौ.मीटर जागा जाफरगेट जवळील मधुकर यंदे नावाच्या एका व्यक्तीला १९७४ मध्ये रू.१५/- प्रती महा भाडे तत्वावर दिली होती. त्या जागे संदर्भात प्रकरण न्याय प्रविष्ट झाले व भाडे पण थंकलेले आहे. आता सध्या त्या व्यक्तीच्या ताब्यात २११६ चौ. मीटर जागा आहे. शिवाय त्या व्यक्तीने ती जागा स्वत:च्या नावावर करून घेतलेली आहे. अधिकारी सांगतात त्यांचेकडे थकबाकी आहे. या संबधीचा रेकॉर्ड महानगरपालिकेकडे नाही का याचा खूलासा करावा.

उपआयुक्त (म) :जाफरगेट येथील जागा मधूकर यंदे यांना साधारणत:१९७४ मध्ये रू.१५ प्रतिमहा एवढया रक्कमेने लिजवर दिलेली होती. १९९४ ला भाडेवाढीला संबधीत व्यक्तीने अक्षेप घेतला व हे प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर या जागे संबधीचा संचिकेचा शोध घेतल्यानंतर संचिका कार्यालयात सापडत नाही व संबधीताशी करारनामा केला आहे किंवा नाही याचा कूठेही बोध होत नाही. मधुकर यंदे यांनी महापालिकेच्या जागेवर स्वत:चे नाव लावले आहे असे पत्र एका व्यक्तीने आजच दिले आहे. आजच नगर भूमापन कार्यालयाला कळविले आहे.

सौ. लता दलाल :संचिका सापडत नाही असे उत्तर देणे बरोबर नाही त्या कार्यकाळात जे कूणी अधिकारी होते त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री. महेश माळवतकर :या अहवालावरून असे दिसून येते अधिकारी यांनी चूकीने कार्यवाही केलेली आहे. चूका केलेल्या आहेत त्यांचेवर कार्यवाही प्रस्तापित करावी.

श्री. संतोष खेडंके :मालमत्ता विभागाच्या अहवालावर भरपूर चर्चा झालेली असून सभागृहाच्या वतीने विनंती की जेदोषी असतील त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी

मा. महापौर : सकाळपासून मालमत्ता विभागाचा जो तपशील, अहवाल समोर आलेला आहे त्यावर चर्चा चालू होती. मग यात चिकलठाणा बाजार असेल ,जाफरगेट बाजार असेल पीर बाजार असेल होर्डीगच्या बाबतीत असेल ,महानगरपालिकेच्या जागांचे बाबतीत असेल या संदर्भात हे सभागृह प्रशासनाला असे निर्देश देते की जे दोषी अधिकारी /कर्मचारी असतील त्यांची आठ दिवसात माहिती घेवून त्यांना निलंबीत करून त्यांची खातेनिहाय चौकशी करावी. दोषी अधिकारी /कर्मचारी यांचेवर प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे त्याचा अहवाल ऑगस्ट २००६ च्या सर्वसाधारण सभेत सादर करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार चिकलठाणा बाजार,जाफरगेट बाजार,पीर बाजार,होर्डीगच्या बाबतीत,तसेच महानगरपालिकेच्या जागांचे बाबतीत या संदर्भात प्रशासनाने जे दोषी अधिकारी /कर्मचारी असतील, त्यांची आठ दिवसात माहिती घेवून त्यांना निलंबीत करून त्यांची खातेनिहाय चौकशी करण्यास तसेच दोषी अधिकारी /कर्मचारी यांचेवर प्रशासनाने काय कार्यवाही केली,त्याचा अहवाल ऑगस्ट २००६ च्या सर्वसाधारण सभेत सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच ''राष्ट्रगिताने ''आजची सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**

महानगरपालिका औरंगाबाद.